**प्रेसनोट** **ता.३०/०३/२०१९**

## कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

## कोंढवा पोलीस ठाणेचा परिसर भिक्षेकरीमुक्त करणेबाबत विशेष उपक्रम

कोंढवा पोलीस ठाणेच्या हद्दीत भिकारी दाम्पत्याने बिगारी कुटुंबीयाच्या लहान मुलांस चोरुन नेण्याची घटना दि २४ /०२/१९ रोजी घडली होती तदनंतर मा अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ -५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि अनिल पाटील पोउनि शिंदे व तपास पथकामधील पोलीस अमंलदार यांनी अहोराञ मेहनत घेवुन भिकारी दाम्पत्याकडुन चोरुन नेलेल्या मुलाची सुटका करुन सदर भिकारी दाम्पत्यास मु.पो.वीर तालूका पुरंदर या ठिकाणाहुन जेरबंद केले

कोंढवा पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये भिका-यांचे वाढते प्रमाणाबाबत वपोनि अनिल पाटील यांनी नागरिकांशी समक्ष चर्चा करुन सदर परिसर भिक्षेकरी मुक्त करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आव्हान केले व परिसर भिक्षेकरीमुक्त करण्याकरिता विशेष योजना राबविली आहे भिक्षेकरी कोंढवा पोलीस ठाणे च्या हद्दीत व आसपासच्या परिसरांत आढळुन आल्यास त्याबाबतचा फोटो व्हॉटस ॲप व अन्य माध्यमातुन शेअर करण्याबाबतचे आव्हान वपोनि पाटील यांनी नागरिकांस केले आहे जेणे करुन त्यांचे विरुध्द योग्य ती उचित कार्यवाही करीता येईल कोंढवा पोलीस ठाणेच्या नागरिंकांनी देखील सदर उपक्रमांस उस्फुर्द प्रतिसाद दिला असुन मागील आठवडयात कोंढवा पोलीस चौकी प्रभारी अधिकारी सपोनि बोधे यांनी चार कारवायां केलेल्या आहेत.

संशियत भिकारी अथवा लहान मुल संशयित व्यक्ती नजरेस पडल्यास तात्काळ कोंढवा पोलीस ठाणे दुरध्वनी क्र.०२०-२६९०३०७८० कोंढवा पोलीस चौकी दुरध्वनी क्र.०२०-२६८३०७८०, खडी मशीन पोलीस चौकी दुरध्वनी क्र.०२०-२६९३०९८० येथे तात्काळ संपर्क साधण्याचे आव्हान देखील वपोनि पाटील यांनी जनतेस केले आहे.

(अनिल पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर